# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.02.2026** **वारः गुरुवार**

---

1. भारत एआय शिखर परिषदेचं उद्घाटन आज पंतप्रधानांच्या हस्ते होणार
2. एआयचा लोककल्याणासाठी वापर करण्यास भारताचं प्राधान्य-केंद्रिय मंत्री अश्विनी वैष्णव यांचं प्रतिपादन
3. आगामी पाच वर्षांच्या कालावधीत भारत आणि अमेरिका यांना समुद्राखालील केबलच्या माध्यमातून जोडण्याची गुगलची घोषणा
4. आजपासून रमजानच्या महिन्याची सुरुवात आणि
5. आयसीसी विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत साखळी सामन्यांमध्ये भारत, दक्षिण अफ्रिका आणि पाकिस्तानचा आपापल्या प्रतिस्पर्ध्यांवर विजय

**एआय समिट**

भारत एआय शिखर परिषदेचं उद्घाटन आज नवी दिल्लीतील भारत मंडपम इथं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. सर्वजन हिताय सर्वजन सुखाय ही भारतात होणाऱ्या एआय शिखर परिषदेची संकल्पना आहे. उद्घाटनाच्या सत्रात फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉं, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनिओ गुटेरस यांच्यासह जगभरातल्या विविध उद्योगप्रमुखांचं भाषण होणार आहे. या शिखर परिषदेत कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातले जागतिक अग्रणी, उद्योगांचे संस्थापक, प्रमुख कार्यकारी अधिकारी, प्रमुख तंत्रज्ञान अधिकारी तसंच विचारवंत यांच्यासह मंत्री आणि वरीष्ठ सरकारी अधिकारी सहभागी होणार आहेत. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल या परिषदेसाठी आलेल्या विविध जागतिक नेत्यांशी संवाद साधला आणि द्विपक्षीय बैठक घेतल्या. या बैठकांमध्ये द्विपक्षीय संबंध, भविष्यातील जागतिक आव्हानं, तंत्रज्ञानातील सहकार्य आणि जागतिक पटलावर भारताची भूमिका याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. पंतप्रधान तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रमुख नेत्यांनाही भेटले. AI इंडिया इम्पॅक्ट प्रदर्शनाला भरघोस प्रतिसाद मिळाल्यानंतर केंद्र सरकारनं या प्रदर्शनाला एका दिवसाची मुदतवाढ दिली आहे. आता हे प्रदर्शन 21 तारखेपर्यंत खुलं असेल.

उद्योगांमध्ये उत्पादकता वाढीसाठी तसंच आरोग्यसेवा, शेती आणि हवामान बदल यासारख्या लोकसंख्येच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी एआयचा वापर करण्यास देश प्राधान्य देत आहे असं केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. AI इंडिया इम्पॅक्ट शिखर परिषदेमधील संशोधन परिसंवादाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. देशातील युवा पिढीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाबाबत दिसणाऱ्या उत्साहाचं कौतुक करताना ते म्हणाले...

**एआई का उसी माध्यम से उसी विजन के साथ किस तरह से पॉपुलेशन स्केल पे प्रॉब्लम्स को सॉल्व कर पाए वो फोकस है इस एआई समिट में आप देख रहे हैं कितनी ऊर्जा है कितनी एनर्जी है किस तरीके से देश के दुनिया के सभी एआई के लीडर्स यहाँ पर उपस्थित है और विशेषकर युवाओं में नौजवानों में बहुत उत्साह है की इस नई टेक्नोलॉजी का उपयोग करके नए सॉल्यूशंस लाए और एक नए तरीके से देश की दुनिया की प्रॉब्लम्स को सॉल्व करे।**

**ऋषी सुनक**

भारत कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रात जगाचे नेतृत्व करण्यास सज्ज आहे असं मत ब्रिटनचे माजी पंतप्रधान ऋषी सुनक यांनी व्यक्त केलं आहे. ते काल नवी दिल्लीत भारत एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेतील एका कार्यक्रमात बोलत होते. तंत्रज्ञानातील नेतृत्व केवळ तंत्रज्ञान संशोधनावर नाही ते तुम्ही कसं वापरता यावरही अवलंबून असल्याचं भारतानं ओळखलं आहे असं सुनक म्हणाले. समाजाकडून एआय तंत्रज्ञानाच्या स्वीकारावर भारताचा भर असून त्याला निष्णात तज्ज्ञांची मोठी संख्या, सक्षम डिजिटल पायाभूत सुविधा आणि तंत्रज्ञानाचा वापर करणारे लोक यांचं पाठबळ आहे असं ब्रिटनचे माजी पंतप्रधान म्हणाले.

**गुगल भारत-अमेरिका**

आगामी पाच वर्षांच्या कालावधीत भारत आणि अमेरिका यांना समुद्राखालील केबलच्या माध्यमातून जोडण्यात येईल असं सांगून यासाठी पंधराशे कोटी डॉलर्सची गुंतवणूक करण्याची घोषणा गुगलनं केली आहे. अमेरिका इंडिया कनेक्ट या पायाभूत सुविधा सहकार्य उपक्रमाच्या माध्यमातून विशाखापट्टणमजवळ विझाग इथं समुद्राखालील नवीन आंतरराष्ट्रीय केबल स्थानक उभारलं जाईल अशी माहिती गुगलनं काल भारत एआय इम्पॅक्ट शिखर परिषदेत दिली. याशिवाय भारताला सिंगापूर, दक्षिण अफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाशी जोडणारे तीन नवीन समुद्राखालील केबलमार्ग तसंच चार धोरणात्मक फायबर ऑप्टीक मार्ग स्थापन करण्यात येतील असं गुगलचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुंदर पिचाई यांनी सांगितलं. रुग्णांकडून आजाराची लक्षणं जाणून घेणं किंवा त्यांची माहिती घेणं तसंच डॉक्टरांना उपयोगी ठरेल असा अहवाल तयार करणं यामध्ये कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करण्याबाबतचं संशोधन करण्यासाठी गुगलनं एम्स रुग्णालयासोबत भागीदारी केल्याची माहिती पिचाई यांनी दिली.

**पोलाद एआय समिट**

भारताच्या पोलाद उत्पादनात गेल्या दहा वर्षात जवळपास दुप्पट वाढ झाल्याची माहिती पोलाद मंत्रालयाचे सचिव संदीप पोंड्रीक यांनी दिली. भारत एआय शिखर परिषदेतील पोलाद मंत्रालयाच्या दालनात झालेल्या कार्यक्रमात ते काल बोलत होते. भारताची पोलाद उत्पादन क्षमता 2030-31 पर्यंत 300 तर 2035-36 पर्यंत 400 दशलक्ष टन होण्याची अपेक्षा असल्याचं ते म्हणाले. या सत्रात प्रमुख पोलाद निर्मिती कंपन्या आणि लोह खाणींच्या प्रतिनिधींनी भविष्यातील पथदर्शी आराखडा कृत्रिम बुद्धीमत्ता क्षेत्रातील नवसंशोधकांसमोर सादर केला. भारताला पोलादाचं जागतिक केंद्र बनवण्याच्या दृष्टीनं या उद्योगातील समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेण्याचं आवाहन यावेळी कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांना करण्यात आलं.

## शिवजयंती

छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती आज साजरी होत आहे. यानिमित्त महाराष्ट्रासह अन्य ठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मभूमी असलेल्या किल्ले शिवनेरीच्या पायथ्याशी, 'श्री छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव: हिंदवी स्वराज्य महोत्सव 2026' हा कार्यक्रम होणार आहे.

## रमजान

आजपासून रमजानचा पवित्र महिना सुरू होत आहे. देशाच्या विविध भागात काल चंद्रदर्शन झाल्यामुळे आज रमजानच्या उपवासाचा पहिला दिवस साजरा केला जाईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पवित्र रमजान महिन्याच्या नागरिकांना शुभेच्छा दिल्या आहेत. हा पवित्र महिना समाजात एकतेची भावना निर्माण करेल आणि शांतता तसंच समृद्धी घेऊन येईल अशी आशा त्यांनी समाजमाध्यमावरील शुभेच्छासंदेशात व्यक्त केली आहे.

## अन्नमहामंडळ करार

भारतीय अन्न महामंडळानं विश्व अन्न उपक्रमासोबत तांदळाच्या पुरवठ्याबाबत सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत अन्नाच्या कमतरतेवर तोडगा काढण्यासाठी भारत वैश्विक मानवतावादी मोहीमांसाठी दोन लाख मेट्रीक टन तांदळाचा पुरवठा करणार आहे. जगात कोणीही उपाशी राहू नये या भारताच्या निर्धाराचं प्रतिबिंब या करारातून दिसून येतं असं अन्न आणि सार्वजनिक वितरण विभागाचे सचिव संजीव चोप्रा यांनी म्हटलं आहे. कुपोषणावर मात आणि अन्न सुरक्षा यासाठी भारत नेहमीच आंतरराष्ट्रीय समुदायाला मदत करेल असं ते म्हणाले.

## क्रिकेट

पुरुषांच्या वीस षटकांच्या आयसीसी विश्वकरंडक स्पर्धेत काल भारतीय संघानं नेदरलँडसच्या संघावर 17 धावांनी विजय मिळवला. अहमदाबाद इथं झालेल्या सामन्यात भारतानं प्रथम फलंदाजी करताना 20 षटकांत 193 धावा केल्या. त्याला उत्तर देताना नेदरलँडसच्या संघाला 20 षटकांत 176 धावा करता आल्या. वरुण चक्रवर्तीनं 3 तर शिवम दुबेनं दोन फलंदाजांना बाद केलं. 31 चेंडूत 66 धावा करणाऱ्या अष्टपैलू शिवम दुबेला सामनावीर घोषित करण्यात आलं. कोलंबो इथं काल झालेल्या दुसऱ्या सामन्यात पाकिस्ताननं नामिबियावर 102 धावांनी विजय मिळवला. ड गटातल्या सामन्यात दक्षिण अफ्रिकेनं युएईच्या संघावर सहा गडी राखून मात केली. आज कोलकत्यात वेस्ट इंडीज आणि इटली, कोलंबो इथं श्रीलंका आणि झिम्बाब्वे तसंच चेन्नईत अफगाणिस्तान आणि कॅनडा या संघांदरम्यान सामना होणार आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**